


दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

**आजचा सुविचार**
दुःखी माणसाला मदत करण्यासाठी
लांबवलेला एक हात
प्रार्थने साठी जोडलेल्या
दोन हातां पेक्षा अधिक उपयुक्त आहे.
– स्वामी विवेकानंद

वर्ष : ०५ | अंक : ५२, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, सोमवार, दि.०६ ऑक्टोबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## बापरे ! मित्रानेच मित्रावर केला प्राणघातक हल्ला !!



**अक्षराज : सुनिल क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** विंचूर शहरात धक्कादायक प्रकार घडला असून, मित्रानेच आपल्या मित्रावर प्राणघातक हल्ला केल्याची घटना घडली आहे. ही घटना विंचूर येथील मारवाडी पेठ परिसरात सायंकाळी सहा वाजेच्या सुमारास घडली.

व्यापारी पवन नंदकुमार जाजू हे आपल्या घरासमोर उभे असताना विंचूर येथील मनोज बोराडे हा तेथे आला व काही कारणावरून त्यांच्याशी वाद घालत अचानक धारदार चाकूने वार केले. या हल्लूयात पवन जाजू गंभीर जखमी झाले असून त्यांना स्थानिक नागरिकांनी तात्काळ लासलगाव येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले. मात्र, जखमा गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी त्यांना नाशिक येथील रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

घटनेनंतर संशयित आरोपी मनोज बोराडे हा घटनास्थळावरून फरार झाला होता. तथापि, लासलगाव पोलिसांनी तत्परतेने कारवाई करत आरोपीला ताब्यात घेतले आहे. या प्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक भास्करराव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

प्राथमिक माहितीनुसार, पवन जाजू आणि मनोज बोराडे हे दोघेही मित्र असून काही वैयक्तिक कारणावरून हा वाद निर्माण झाला असल्याची माहिती समोर आली आहे. विंचूर परिसरात या घटनेने खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेच्या पार्श्वभूमीवर आज दिनांक ६ सोमवार रोजी व्यापारी असोसिएशननी विंचूर गाव पूर्णतः बंद ठेवण्याची हाक दिली आहे.

## भारताने पाकिस्तानची पुन्हा जिरवली, महिलांनी केले ऑपरेशन सिंदूर यशस्वी




**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, कोलंबो :** भारताच्या महिलांनीही मैदानात पाकिस्तानची पुन्हा एकदा जिरवली. आशिया कपमध्ये भारताने पाकिस्तानला तिन्ही सामन्यांत पराभूत केले होते. आता महिलांनीही पाकिस्तानला धुळ चारली. भारताने प्रथम फलंदाजी करताना २४७ धावा केल्या होत्या. भारताने पाकिस्तानचा डाव १५९ धावांवर आटोपला आणि ८८ धावांनी मोठा विजय साकारला.

भारत आणि पाकिस्तान यांच्यातील सामना चांगलाच रंगतदार झाला होता. पाकिस्तानच्या सिद्रा अमीनने ८१ धावांची दमदार खेळी साकारली आणि त्यामुळे हा सामना कोण जिंकेल, हे सांगता येत नव्हते. पण स्नेह राणाच्या गोलंदाजीवर हरमनप्रीत कौरने तिचा झेल पकडला आणि भारतीय संघाने जोरदार सेलिब्रेशन केले. कारण सिद्राचा अपवाद वगळता एकाही खेळाडूला चांगली फलंदाजी करता आली नाही. कारण भारताने सुरुवातीपासूनच अचूक आणि भेदक मारा केला होता. त्यामुळे पाकिस्तानला धावा जमवणं कठीण होऊन बसलं होतं. पण सिद्रा एकटीच भारताच्या गोलंदाजीचा चांगला सामना करत होती. त्यामुळे सिद्राची विकेट जेव्हा भारताला मिळाली, तिथेच त्यांनी हा सामना जिंकल्याचे म्हटले गेले आणि तसेच झाले.

भारताकडून या सामन्यात एकाही खेळाडूला अर्धशतक साकारता आले नाही. पण सर्व खेळाडूंनी आपले चांगले योगदान दिले. भारताकडून हरलिन देओलने सर्वाधिक ४६ धावांची खेळी साकारली. सामन्याच्या अखेरच्या षटकांत भारताचा डाव अडचणीत सापडला आहे, असे वाटत होते. पण त्यावेळी रिचा घोष ही भारताच्या मदतीला धावून आली. रिचाने अखेरच्या षटकांत तुफानी फटकेबाजी केली. रिचाने २० चेंडूंत तीन चौकार आणि दोन षटकारांच्या जोरावर नाबाद ३५ धावांची खेळी साकारली. रिचाच्या या खेळीमुळेच भारताला यावेळी २४७ धावा करता आल्या.

भारताच्या गोलंदाजांनी यावेळी दमदार कामगिरी केली. भारताची वेगवान गोलंदाज क्रांती गौडने यावेळी तीन विकेट्स मिळवल्या, तर फिरकीपटूनेही तीन बळी मिळवत क्रांतीला चांगली साथ दिली. त्यामुळेच भारताला या सामन्यात मोठा विजय मिळवता आला. भारताचा हा या वर्ल्ड कपमधील सलग दुसरा विजय ठरला आहे. पाकिस्तानच्या सामन्यात भाताकडून चांगली सांघिक कामगिरी पाहायला मिळाली आणि त्यामुळेच त्यांना विजय मिळवता आला.

## टाकळी ढोकेश्वर सोसायटीची वार्षिक सभा खेळीमेळीत



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.५, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील टाकळी ढोकेश्वर येथिल विविध कार्यकारी सेवा सहकारी या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा सोसायटीच्या सभागृहात चेअरमन नारायण झावरे यांच्या अध्यक्षतेखाली खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.

संस्थेचे सचिव विजय गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. विविध विषयांवर चर्चा झाली. याप्रसंगी संचालक महेश पाटील, श्रावण गायकवाड माजी उपसरपंच सुनील चव्हाण, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सभेस चेअरमन नारायण झावरे, व्हा. चेअरमन मोहनराव रांधवण, निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी, सावली प्रतिष्ठानचे संतोष सोनवळे, माजी सभापती विलास झावरे, संचालक महेश पाटील, बबन सावळेराम पायमोडे, जयसिंग झावरे, दौलत जेजुरकर, शिवाजी काशिनाथ खिलारी, मल्हारी धुमाळ, बबन बांडे, श्रावण गायकवाड, अलका बांडे, सुनंदाबाई गोरडे, माजी चेअरमन, माजी सरपंच शिवाजी खिलारी, ग्राम पंचायत सदस्य बापूसाहेब रांधवण, बबनराव पायमोडे बाळासाहेब रांधवण, बाबासाहेब झावरे, गंगाधर बांडे, विलास नाईकवाडी, शिवाजी पायमोडे यांच्यासह सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महाराष्ट्रात 'कोल्ड्रिफ' सिरपवर बंदी !!

## खोकल्याचं हे औषध कुठल्याही मेडिकलमध्ये सापडलं तर फोन करा

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०५, मुंबई :** महाराष्ट्र सरकारने लहान बालकांच्या आरोगाच्या पार्श्वभूमीवर मोठा निर्णय घेतला आहे. राज्य सरकारने वादग्रस्त ठरलेल्या कप सिरफ 'कोल्ड्रिफ'वर बंदी घातली आहे. राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाकडून हा मोठा निर्णय घेण्यात आला आहे. खोकल्याच्या औषधामुळे विषबाधा होऊन चिमुकल्यांचा मृत्यू झाल्याचा धक्कादायक प्रकार मध्य प्रदेशात समोर आला होता. यानंतर इतर राज्यांमध्ये असा काही प्रकार समोर येत होता. संबंधित प्रकरण हे सुप्रीम कोर्टातही गेलं होतं. या प्रकरणी चिमुकल्या मुलांच्या आरोग्याशी कोणताही धोका उद्भवू नये यासाठी राज्याच्या अन्न आणि नागरी पुरवठा विभागाने संबंधित औषधावर बंदी घातली आहे. महाराष्ट्रात कोल्ड्रिफ सिरपच्या विक्री, उत्पादन आणि वितरणावर बंदी घालण्यात आली आहे. या सिरपमुळे मध्य प्रदेश आणि राजस्थान जिल्ह्यांमध्ये आतापर्यंत १८ लहान मुलांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर महाराष्ट्र राज्याने या वादग्रस्त औषधावर बंदी घातली आहे.

महाराष्ट्राच्या अन्न आणि औषध प्रशासनाने टोल फ्री नंबर जारी केला आहे. कोणत्याही औषधांच्या दुकानात किंवा मेडिकलमध्ये कोल्ड्रिफ सिरप आढळल्यास टोल फ्री क्रमांकावर फोन करुन माहिती देण्याचं आवाहन करण्यात आलं आहे.

**नेमकं प्रकरण काय?**

कोल्ड्रिफ सिरपचा वापर तत्काळ थांबवा, असे निर्देश अन्न आणि औषध प्रशासन विभागाकडून देण्यात आले आहे. या सिरपमुळे मध्यप्रदेश आणि राजस्थानमध्ये काही मुलांच्या मृत्यूच्या घटना समोर आल्या आहेत. या घटनांच्या पार्श्वभूमीवर नागपुरात आजपासून शोध मोहीम हाती घेण्यात आली आहे, असे एफडीएचे सहआयुक्त मनीष चौधरी यांनी सांगितले.

मध्य प्रदेश आणि राजस्थानमध्ये दूषित कफ सिरपमुळे लहान मुलांचा मृत्यू झाल्याचा संशय व्यक्त करण्यात येत असल्याच्या पार्श्वभूमीवर विविध राज्यांनी कफ सिरपविरोधात




शड्डू ठोकले आहे. मध्य प्रदेश सरकारने कोल्ड्रिफ या कफ सिरपवर बंदी घातली आहे, तर केरळ सरकारने या कफ सिरपची विक्री व वितरण स्थगित केले आहे.

मध्य प्रदेशमधील छिंदवाडा जिल्ह्यात संशयास्पद किडनी संसर्गामुळे १४ मुलांचा मृत्यू झाल्याने राज्य सरकारने शनिवारी कोल्ड्रिफ सिरपच्या विक्रीवर बंदी घातली. महाराष्ट्रातील एफडीएनेही अशा घटना होऊ नये यासाठी खबरदारी घेण्याच्या सूचना स्थानिक यंत्रणांना दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर नागपुरातील एफडीए कार्यालयाने घाऊक औषध विक्रेत्यांची तपासणी मोहीम हाती घेतली आहे. संशयित औषध विक्रेत्यांकडील नमुने गोळा करून ते प्रयोगशाळेत पाठविण्यात येईल, असे चौधरी यांनी सांगितले. आतापर्यंत नागपुरातील औषध विक्रेत्यांकडे कोल्ड्रिफ सिरप सापडले नाही. त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. गेल्या वर्षभरात एफडीएने खोकल्याच्या औषधीचे १५ नमुने गोळा करून ते प्रयोगशाळेत पाठविले होते. त्याचा अहवाल प्राप्त झाला असून हे सर्व नमुने प्रमाणित आढळले आहे, असे चौधरी यांनी सांगितले. तपासणीत नमुने दोषी आढळेल तर कठोर कारवाई करण्यात येईल, असेही चौधरी यांनी सांगितले.

**आणखी १४ मुले गंभीर...**

मध्यप्रदेशातील छिंदवाडा जिल्ह्यातील किमान १४ मुले नागपुरातील सरकारी आणि खाजगी रुग्णालयात मृत्यूशी झुंज देत आहेत. त्यांना बंदी असलेले कोल्ड्रिफ कफ सिरप देण्यात आले आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला असून नागपुरात दाखल झालेल्यांचा मृत्यू डायथिलीन ग्लायकोल (डीईजी) च्या विषारीपणामुळे झाल्याचे आता स्पष्ट झाले आहे.

सुरुवातीला हे मृत्यू तीव्र एन्सेफलायटीस सिंड्रोम (एईएस) मुळे झाल्याचे गृहीत धरले जात होते. मात्र खोकला आणि तापासाची लक्षणे असलेल्या या रुग्णांबाबत सरकारी डॉक्टरांनी संशय व्यक्त केला होता. आता सत्य पुढे आल्याने नागपूर महापालिकेने सर्व वैद्यकीय व्यावसायिकांसाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी केले आहेत. यात पाच वर्षांखालील मुलांना कफ सिरप लिहून देऊ नये, असा सल्ला देण्यात आला.


तीन रुग्ण अत्यवस्थ असून दोघे गंभीर आहेत. मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे मृत्यूमुखी पडलेल्या सहा मुलांना कोल्ड्रिफ सिरप देण्यात आले होते. विषारी औषधीमुळेच किडणी निकामी होते, असे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बोलरोग विभागाचे प्रमुख डॉ. मनीष तिवारी यांनी सांगितले.

**नागपुरात शहरात एकही प्रकरण नाही...**

नागपूर विभागातील सर्व सार्वजनिक आरोग्य रुग्णालयांना हे औषध देऊ नये असे निर्देश देण्यात आले आहे. तथापि, आमच्या कोणत्याही रुग्णालयात कोल्ड्रिफचा पुरवठा नाही. नागपूर किंवा विदर्भातील इतर जिल्ह्यांमधील मुलांचे मूत्रपिंड निकामी झाल्याचे एकही प्रकरण अद्याप नोंदविले नाही. विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये एइएस (ॲक्युट एन्सेफलायटीस सिंड्रोम) प्रकरणे आहेत, मात्र या प्रकरणांशी खोकल्याच्या औषधीचा काही संबंध नाही, असे आरोग्य सेवा उपसंचालक डॉ. शशिकांत शंभरकर यांनी सांगितले.

दोन रुग्णांना कोल्ड्रिफ व्यतिरिक्त आणखी दोन सिरप देण्यात आले. एकाला फिव्हरसीआयपी आणि दुसऱ्याला नोस्ट्राडीएस देण्यात आले. त्यांच्यावरही उपचार करण्यात येत असून त्यांची प्रकृती गंभीर आहे, असे नेल्सन रुग्णालयात मध्य प्रदेशातील सहा मुलांवर उपचार करणारे बालरोगतज्ज्ञ डॉ. अनुपम बहे म्हणाले.

## विषारी साप पकडतांना सर्पमित्राचा सर्पदंशाने मृत्यू



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, बल्लारपूर (चंद्रपूर) :** पावसाळी दिवसात वेगवेगळ्या प्रकारचे सर्प आपल्या बिळातून बाहेर निघतात अशाच प्रकारचा विषारी सर्प बल्लारपूर पेपर मिल न्यू कॉलनी परिसरात सर्प पकडण्याचा प्रयत्न करणाऱ्या सर्पमित्राचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना बल्लारपूर शहरात घडली आहे. महेंद्र भडके (वय ३२), रा. विद्यानगर वार्ड, सावित्रीबाई फुले चौक, बल्लारपूर असे मृत सर्पमित्राचे नाव आहे.

ही घटना आज सकाळी अंदाजे १०.३० वाजता घडली. बल्लारपूर पेपर मिल परिसरातील न्यू कॉलनी येथील नर्सरीमध्ये नाग जातीचा साप दिसल्याची माहिती मिळाल्यानंतर महेंद्र भडके हे सापाला पकडण्यासाठी तेथे गेले होते. साप पकडण्याच्या प्रयत्नात असताना सापानेद त्याला दोन वेळा दंश केला.

महेंद्रला लगेच तातडीने ग्रामीण रुग्णालय, बल्लारपूर येथे उपचारासाठी नेण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी जिल्हा सामान्य रुग्णालय, चंद्रपूर येथे हलविण्यात येत होते. दुर्दैवाने वाटेतच त्याचा मृत्यू झाला. विशेष म्हणजे महेंद्र भडके हे शहरातील ओळखलेले सर्पमित्र होते.

विविध भागात साप पकडून सुरक्षितपणे जंगलात सोडण्याचे कार्य ते सातत्याने करत असत. त्यांच्या अकस्मात निधनाने बल्लारपूर शहरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

## वडगावशेरीत तीव्र पाणीटंचाई; आ.पठारे यांचा महापालिकेवर धडक मोर्चाचा इशारा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०५, वडगाव शेरी (पुणे) :** वडगावशेरी विधानसभा मतदारसंघातील नागरिक गेल्या काही महिन्यांपासून तीव्र पाणीटंचाईचा सामना करत आहेत. अत्यल्प कालावधीसाठी होणाऱ्या पाणीपुरवठ्यामुळे नागरिकांना विशेषतः महिला वर्गाला प्रचंड गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. या गंभीर समस्येकडे पुणे महानगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याचा थेट आरोप आमदार बापूसाहेब पठारे यांनी केला असून, या प्रश्नावर तोडगा निघाला नाही तर येत्या ७ ऑक्टोबर रोजी सकाळी ९ वाजता पुणे महानगरपालिकेवर धडक मोर्चा आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा त्यांनी दिला आहे.

आमदार पठारे म्हणाले की, महानगरपालिका आयुक्त, मुख्य अभियंता व पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांशी लेखी तसेच प्रत्यक्ष पातळीवर वारंवार पाठपुरावा करूनही अद्याप कोणतीही ठोस सुधारणा झालेली नाही. विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात ११ मार्च रोजी झालेल्या बैठकीत अध्यक्षांच्या सूचनेनंतर महापालिकेने दिलेल्या लेखी आश्वासनाची अंमलबजावणी झालेली नाही. परिणामी, नागरिकांच्या पाणीटंचाईचा प्रश्न आजही जैसे थे आहे. धानोरी, लोहगाव, विमाननगर, खराडी आणि वडगावशेरी भागातील पाण्याच्या टाक्यांची कामे अतिशय संथ गतीने सुरू असून ती तातडीने पूर्ण करावीत, अशी मागणी पठारे यांनी केली. समान पाणीपुरवठा योजनेअंतर्गत प्रत्येक नागरिकाला दररोज किमान अडीच तास पाणी मिळालेच पाहिजे, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. फक्त पाणीपुरवठा नव्हे, तर मतदारसंघातील मूलभूत विकासकामांकडेही प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे. प्रलंबित रस्त्यांची कामे, वाहतूक कोंडी, अपुऱ्या आरोग्यसेवा, ड्रेनेज आणि पावसाळी पाण्याच्या लाईनची कामे, तसेच गार्डन आणि स्मशानभूमींचा विकास या मागण्या देखील मोर्चात मांडण्यात येणार आहेत. पूरस्थिती टाळण्यासाठी नालेसफाई व जलनिस्सारणाची कामे तातडीने राबवावीत, तसेच लोहगाव–वाघोली विकास आराखडा मंजूर करावा, अशीही मागणी करण्यात आली आहे.

१४ ऑगस्टपासून ३ ऑक्टोबरपर्यंत झालेल्या सलग पत्रव्यवहारानंतरही प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे नागरिकांसह रस्त्यावर उतरल्याशिवाय पर्याय उरलेला नाही, असे सांगत आमदार पठारे यांनी प्रशासनाला कठोर इशारा दिला आहे. जनतेच्या मूलभूत गरजांकडे जर अजूनही दुर्लक्ष झाले, तर पुढील आंदोलन आणखी तीव्र केले जाईल, असा इशारा देत त्यांनी या लढ्याची दिशा स्पष्ट केली आहे.

# संपादकीय



## जीवघेणी लोकप्रियता

नेता-अभिनेता विजय याच्या प्रचारसभेमध्ये चेंगराचेंगरी होऊन अनेक निरपराध नागरिकांना प्राणास मुकावे लागण्याची दुर्घटना, हा अधिकाधिक गर्दी जमवून शक्तिप्रदर्शन करण्याचा राजकीय नेत्यांचा सोस, आपल्या आवडत्या अभिनेत्याला पाहण्यासाठी बेभान होणाऱ्या चाहत्यांचा अतिउत्साह, अपुरे नियोजन व गर्दी आवरण्यात सरकारी यंत्रणांचे अपयश अशा विविध स्तरांवरील बेजबाबदारपणाचा परिपाक आहे.

तमिळनाडूतील करूर येथे आयोजित करण्यात आलेल्या सभेत ४० जणांचा मृत्यू झाला आणि पन्नासहून अधिक जण जखमी झाले. मृत्युमुखींमधील १६ महिलांचा आणि दहा बालकांचा समावेश अधिक सुन्न करणारा आहे. ही घटना जेवढी हृदयद्रावक आहे; त्याहून आता या घटनेबाबत सुरू झालेले आरोप-प्रत्यारोप आणि राजकारण संतापजनक आहे. नेते-अभिनेते, क्रिकेटपटूंचे असे इव्हेंट आणि धार्मिक कार्यक्रमांच्या स्थळीची अनावर गर्दी यामुळे यापूर्वीही अनेक दुर्घटना घडल्या आहेत; मात्र त्यातून काहीही बोध न घेता, कोणतीही उपाययोजना न करता पुन्हा त्याच उत्साहाने अशा कार्यक्रमांच्या आयोजनाचा सपाटा सुरूच आहे. या देशात माणसांच्या जीवाला किडामुंग्यांइतकीही किंमत राहिलेली नाही, हेच या बेफिकिरीतून दिसते.

अन्न, वस्त्र, निवारा यांप्रमाणेच चित्रपट हीसुद्धा मूलभूत गरज असावी, अशी स्थिती दक्षिणेकडील राज्यांत, विशेषत: तमिळनाडूत आहे. त्यामुळे लोकप्रियतेचे उच्चांक गाठून, त्या बळावर राजकारणातही प्रचंड यश मिळविलेल्या अभिनेत्यांचीही संख्या तेथे मोठी आहे. जोसेफ विजय याच परंपरेतला. एका चित्रपटासाठी दीडशे ते दोनशे कोटी रुपये आकारणाऱ्या या अभिनेत्याचे समाजमाध्यमांतही कोट्यवधी फॉलोअर आहेत. गेल्या वर्षी त्याने राजकारणात उडी घेतली आणि तमिळग वेत्री कळघम या पक्षाची (टीव्हीके) स्थापना केली. वेल्लीपुरममध्ये गेल्या वर्षी या पक्षाच्या पहिल्या मेळाव्यातही अशीच चेंगराचेंगरी होऊन सहा जणांचा बळी गेला होता. तेव्हापासून त्याच्या सभा-मेळाव्यांबाबत पोलिस अधिकच खबरदारीच्या सूचना देत होते; परंतु यांपैकी कोणत्याही उपाययोजनांचे पालन झालेले नसल्याचे करूर दुर्घटनेतून दिसते. या सभेला सुमारे बारा हजार नागरिक येतील, असा अंदाज वर्तवून पक्षाकडून परवानगी घेण्यात आली होती; प्रत्यक्षात तेथे ३० हजारांहून अधिक लोक जमले.

सभेचे मुख्य आकर्षण असलेला विजय सहा तास उशिरा आल्याने गर्दीत भर पडत गेली. चेंगराचेंगरी कशी झाली याच्या कारणांत, काही जण झाडाच्या फांद्यांवरून खाली कोसळल्याचा, वाहनातून फेकलेल्या पाण्याच्या बाटल्या घेण्यासाठी झुंबड उडाल्याचा समावेश आहे. काहीही असले, तरी प्रशासनयंत्रणाही अपुरी पडली अन् गर्दी नियंत्रणात राहिली नाही, गर्दीच्या व्यवस्थापनासाठी विजयच्या पक्षाकडे शिस्तबद्ध कार्यकर्त्यांची फळी नव्हती, हेच यामागील वास्तव. या दुर्घटनेनंतर पंतप्रधानांपासून ते स्वत: विजयनेही तीव्र दु:ख व्यक्त केले असून बळी पडलेल्यांच्या कुटुंबीयांना आणि जखमींना आर्थिक मदतही जाहीर केली आहे; त्यामागील भावना प्रामाणिक असेलही, मात्र त्यातून गेलेले जीव परत येणार नाहीत.

गर्दीमुळे नागरिकांना प्राणास मुकावे लागल्याच्या दुर्घटनांची मालिका सध्या दिसते. प्रयागराजमध्ये कुंभमेळ्यात चेंगराचेंगरी होऊन अनेकांचे बळी गेले होते. दिल्लीत मेट्रो स्टेशनवर हाच प्रकार घडला. बेंगळुरूमध्ये 'आयपीएल' विजेत्या संघाच्या स्वागतासाठी जमलेल्या गर्दीतही चाहत्यांचे बळी गेले. अभिनेता अल्लू अर्जुनच्या चित्रपटाच्या खेळासाठी जमलेली गर्दी जीवघेणी ठरली; त्याप्रमाणेच नवी मुंबईत 'महाराष्ट्रभूषण' पुरस्कार कार्यक्रमातही अशीच दुर्घटना घडली होती. तेव्हाच्या उन्हाळ्याने दुर्घटनेची तीव्रता वाढवली. विजयच्या सभेत चाहत्यांची गर्दी रोखणे अवघड झाले; पण अनेक नेते जगाला आपली शक्ती दाखवून देण्यासाठी प्रसंगी पैसे-जेवण-मद्य अशी आमिषे दाखवून गर्दी जमवत असल्याचेही अनेकदा उघडकीस आले आहे. त्यांच्या या सोसापायी करोनाकाळातही अलोट गर्दीच्या सभांचे आयोजन झाल्याचे देशाने पाहिले आहे.

# अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ अभिनेत्री संध्या

आपल्या अभिनय आणि नृत्य कौशल्याने मराठी आणि हिंदी चित्रपट सृष्टीत वेगळे स्थान निर्माण करणाऱ्या जेष्ठ अभिनेत्री संध्या शांताराम यांचे वृद्धापकाळाने ४ ऑक्टोबर रोजी दुःखद निधन झाले. त्यांच्या निधनाने चित्रपट सृष्टीची मोठी हानी झाली.

अभिनेत्री संध्या म्हणजे अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ. २७ सप्टेंबर १९३२ रोजी जन्मलेल्या अभिनेत्री संध्या यांचे पूर्ण नाव विजया श्रीधर देशमुख असे होते. त्यांचे वडील रंगभूमीवरील कलाकार होते. त्यामुळे अभिनेत्री संध्या यादेखील रंगभूमीवर काम करू लागल्या. त्यांच्या मोठ्या भगिनी वत्सला या देखील रंगभूमीवर काम करत असत. अभिनेत्री संध्या यांना लहानपणापासूनच नृत्याची आवड होती त्यामुळे त्या नृत्याचे देखील कार्यक्रम करत असत. याच नृत्याने त्यांना चित्रपट सृष्टीत प्रवेश मिळवून दिला. दिग्दर्शक व्ही शांताराम यांनी अमर भूपाळी या चित्रपटासाठी अभिनेत्री संध्या यांची निवड केली कारण हा चित्रपट तमाशाप्रधान होता. यातील मुख्य नायिका ही तमासगिरीन होती. सहकाजीकच नायिकेला नृत्य कौशल्याची जाण असणे गरजेचे होते. अभिनेत्री संध्या यांच्याकडे नृत्य कौशल्याची चांगली जाण असल्याने त्यांची या चित्रपटासाठी निवड झाली. या चित्रपटातील तमासगिरणीच्या भूमिकेसाठी अभिनेत्री संध्या यांनी खूप कष्ट आणि नृत्याचे धडे गिरवले. त्यांच्या या कष्टाचे चीज झाले. हा चित्रपट खूप गाजला. यातील गाणीही खूप गाजली. त्यानंतर त्यांना परछाई या हिंदी चित्रपटात खलनायिकेची भूमिका मिळाली या चित्रपटात त्यांनी संध्या हे नाव धारण केले पुढे हेच नाव रूढ झाले. झनक झनक पायल बाजे या संगीतप्रधान चित्रपटातही त्यांनी मुख्य नायिकेची भूमिका साकारली. या भूमिकेने त्यांना अनेक चित्रपट मिळवून दिले. तीन बत्ती चार रास्ता, दो आँखें बाराह हात, नवरंग यासारखे त्यांनी अभिनय केलेले चित्रपट देखील हिट झाले. नवरंग या चित्रपटातील जा रे जा नटखट.... या गाण्यात त्यांनी पुरुष आणि स्त्री अशा दोन्ही भूमिका निभावल्या. त्यानंतर त्यांनी स्त्री, सेहरा, लडकी सह्याद्री की, जल बन मछली नृत्य बिन मजली हे त्यांचे चित्रपट देखील गाजले. अभिनेत्री संध्या यांचा सर्वाधिक गाजलेला आणि लक्षात राहिलेला चित्रपट



म्हणजे पिंजरा. या चित्रपटात त्यांनी साकारलेली नायिका अजूनही रसिकांच्या मनात घर करून आहे. अभिनय सम्राट निळू फुले, डॉ.श्रीराम लागू यांच्यासारखे दिग्गज कलावंत असतानाही अभिनेत्री संध्या यांची भूमिका रसिकांच्या लक्षात राहिली. या चित्रपटातील सर्व गाणी गाजली. या चित्रपटाने त्याकाळी विक्रम केला होता. चंदनाची चोळी अंग अंग जाळी हा त्यांचा शेवटचा चित्रपट. हा चित्रपटही गाजला. त्यानंतर मात्र त्यांनी मनोरंजन विश्वातून निवृत्ती स्वीकारली. अभिनेत्री संध्या यांनी राजकमल चित्रपट संस्थेखेरीज इतर कोणत्याही चित्रपट संस्थेच्या चित्रपटात काम केले नाही. शेवटपर्यंत त्या राजकमल आणि व्ही शांताराम यांच्याशी एकनिष्ठ राहिल्या. त्यांनी व्ही शांताराम यांच्याशी विवाह केला. व्ही शांताराम यांच्या त्या तिसऱ्या पत्नी होत्या. त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. महाराष्ट्र सरकारने त्यांना राज कपूर जीवनगौरव पुरस्काराने गौरविले. अभिनय आणि नृत्य यांचा सुंदर मिलाफ असलेल्या अभिनेत्री संध्या यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# 'भ्रष्टाचार' तसुभरही कमी झालेला नाही

'इथे हे तिथे ते' या लोकसत्ता (०३/०९)मधील अन्वयार्थ मधुन भ्रष्टाचाराबाबत योग्य भाष्य केले आहे. ठाणे महापालिकेतील ऊपायुक्तांना चक्क महापालिकेच्या कार्यालयातच रंगेहाथ पकडले, जवळपास तीस लाख रुपयांच्या लाचेचे हे प्रकरण आहे.

याच ठाणे महापालिकेतील भ्रष्टाचाराबाबत कै. आनंद दिघे यांनी ऐक्केचाळीस टक्के भ्रष्टाचारात जातात असे म्हटले होते.अर्थात लाच घेताना पकडले जाणार हे काही अपवादात्मक ऊदाहरण नाही,तर देशात काय किंवा राज्यात काय भ्रष्टाचार जिकडेतिकडे बोकाळला आहे पकडला जात नाही तोपर्यंत सगळेच साव असल्याचा आव आणतात.

या अगोदर वसई महानगरपालिकेच्या आयुक्तांना करोडो रुपयांची अवैध संपत्ती सापडल्या प्रकरणी अटक झाली होती ईडी च्या झाप्यात मोठे घबाड सापडले होते. ना खाऊंगा ना खाने दुंगा, भ्रष्टाचार मुक्त भारत च्या कितीही वल्गना होत असल्या तरी प्रत्येक टप्प्यावर भ्रष्टाचार बोकाळला आहे आणि त्याची परिणती अशा गैरप्रकारांमध्ये होते हे वास्तव आहे. भ्रष्टाचार केवळ ठाणे, वसई या महानगरपालिकांमध्ये होतो असे नाही तर मुंबई, कल्याण डोंबिवली, या सारख्या महानगरपालिकेतील भ्रष्टाचार अनेकदा समोर आला आहे.

भ्रष्टाचाराची किड ही गावातल्या तलाठी, ग्रामपंचायत कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत सर्व दुर पसरलेली आहे. कधीकाळी टेबलाखालून सुरू झालेल्या भ्रष्टाचाराची मजल आता करोडो रुपयांपर्यंत पोहचला आहे. राजकिय पक्ष, नेते, कार्यकर्ते, कंत्राटदार, दलाल, कमिशन एजंट, नोकरशहा यांच्या भ्रष्टाचाराची अभेद्य अशी साखळीच निर्माण झाली आहे. ज्यांच्यावर भ्रष्टाचार निर्मूलनाची जबाबदारी आहे तेच भ्रष्टाचार करत आहेत, ना कोणाला शिक्षेची भिती ना कोणाला कायद्याचा धाक राहिला आहे. भ्रष्टाचार आवडे सर्वांना अशी परिस्थिती आहे. भ्रष्टाचार ही जागतिक समस्या आहे, भारत देखील त्याला अपवाद नाही जागतिक भ्रष्टाचाऱ्यांच्या यादीत भारताचा वरचा नंबर लागतो. असे एकही सरकारी खाते नाही, की कुठलेही श्रेत्र नाही जिथे काम करणाऱ्यांचे हात



**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**मोबा. ९१५८४९५०३७**

बरबटलेले नाही. भ्रष्टाचाराबाबत न्यायव्यवस्थेकडे मोठ्या अपेक्षेने पाहिले जाते मात्र न्यायाधिशाकडेच करोडो रुपये सापडतात, जाळले जातात हे या देशातील कटु सत्य आहे. सध्याच्या सरकारच्या काळात तर भ्रष्टाचाराबाबत अजबच कार्यपद्धती बघायला मिळते, भाजपनेच एखाद्यावर भ्रष्टाचाराचे आरोप करायचे, सरकारने सगळ्या यंत्रणा कामाला लावायच्या आणि कालांतराने त्याला आपल्या पक्षात घेऊन सत्ताकारण करायचे. विशेष म्हणजे भाजप सोबत गेल्यास कारवाईची भिती रहाते नाही, रात्री शांत झोप लागते शिवाय सत्तापदे देखील मिळतात भाजप सोबत न गेल्यास त्याचा अरविंद केजरीवाल, हेमंत सोरेन होतो अशा पद्धतीने भ्रष्टाचार मुक्त भारत होणार तरी कसा?. भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी अनेक कायदे आहेत, नियम आहे मात्र त्या राबविणाऱ्या यंत्रणाच आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडत नाही, अनेकदा तर अशा यंत्रणांमधील नोकरशहां हेच भ्रष्टाचार करतांना पकडले जात आहेत. भ्रष्टाचार करण्याची संधी मिळावी म्हणून मलईदार खाते, क्रिम पोस्टिंग साठी करोडो रुपयांची आर्थिक उलाढाल होते, देवाणघेवाण होते. काळा पैसा भारतात परत आणणार असे सांगून दहा अकरा वर्षे ऊलटली मात्र ना एक रुपया भारतात परत आला ना कोणी भ्रष्टाचार करून परदेशी पळुन गेलेला भगोडा. ऐकूणच भ्रष्टाचार आवडे सर्वांना कारण आपण सगळे भाऊ भाऊ मिळून सारे लुटून खाऊ अशीच परिस्थिती जिकडेतिकडे दिसते आहे. भ्रष्टाचार करतांना अनेकजण सापडतात मात्र फार क्वचितच एखाद्याला शिक्षा होते.भ्रष्टाचाराला कायदेशीर मान्यता मिळणे बाकी आहे.

# गुरुजीशिवाय पर्याय नाही!

आजचा काळ हा झपाट्याने बदलणाऱ्या तंत्रज्ञानाचा काळ आहे. 2G, 3G, 4G, 5G आणि आता 6G चं युग आपल्या दारात उभं आहे. माहितीचा महासागर आता बोटांवर उपलब्ध आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, ऑनलाईन शिक्षण आणि स्मार्ट साधनांनी शिक्षणाची पद्धत पूर्णपणे बदलून गेली आहे.


परंतु या सर्व आधुनिकतेच्या गदारोळातही एक सत्य मात्र अढळ राहिलं आहे ˉ मानव घडविण्यासाठी 'गुरुऋ' शिवाय पर्याय नाही!

तंत्रज्ञान ज्ञान देऊ शकते, पण संस्कार देऊ शकत नाही. इंटरनेट माहिती देऊ शकते, पण प्रेरणा देऊ शकत नाही. मोबाईलमध्ये उत्तरं मिळतील, पण जीवनाचे धडे फक्त शिक्षकच शिकवू शकतात.

म्हणूनच शिक्षकाचं स्थान सर्वश्रेष्ठ आहे ˉ तो समाजाचा शिल्पकार आहे, संस्कारांचा वाहक आहे, आणि भावी पिढीचा मार्गदर्शक आहे.

'गुरु' या शब्दाचा अर्थच अत्यंत अर्थपूर्ण आहे ˉ 'गु' म्हणजे अंधार आणि 'रु' म्हणजे प्रकाश. म्हणजे जो अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा प्रकाश देतो, तोच खरा गुरु.

शिक्षक म्हणजे फक्त पुस्तकातील धडे शिकवणारा नव्हे, तर जीवन जगण्याची कला




शिकवणारा असतो. तो विद्यार्थ्यांच्या मनात आत्मविश्वासाची ज्योत पेटवतो, विचारांची दिशा देतो आणि त्यांच्या भविष्यातील पाया घालतो.

प्रत्येक यशस्वी व्यक्तीच्या आयुष्यात कुणीतरी शांतपणे उभा असतो ˉ तो म्हणजे शिक्षक. डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, नेते, कलाकार ˉ हे सगळे आपल्या शिक्षकांचेच घडवलेले विद्यार्थी असतात. शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळेच समाज पुढे सरकतो आणि संस्कृती टिकून राहते.

आज शिक्षण तंत्रज्ञानाशी जोडले गेले असले, तरी शिक्षकाचे महत्त्व कधीच कमी होऊ शकत नाही. कारण मशीन शिकवते 'काय करायचं', पण गुरु शिकवतो 'का करायचं'. मशीन ज्ञान देते, पण गुरु मूल्यं देतो.

या जागतिक शिक्षक दिनानिमित्ताने सर्व शिक्षकांना मन:पूर्वक प्रणाम!

त्यांच्यामुळेच आपलं आयुष्य आकार घेतं, विचारांना दिशा मिळते आणि समाजाला योग्य नेतृत्व मिळतं.

शिक्षक हा केवळ व्यावसायिक नव्हे, तर तो एक मूल्यसंस्कार निर्माण करणारा कलाकार आहे.

चला, आजच्या या दिवसानिमित्ताने आपण सर्वजण आपल्या शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त करूया.

कारण...

2G, 3G, 4G, 5G, 6G येईल, पण आम्हाला घडविण्यासाठी 'गुरुजी' शिवाय पर्याय नाही!

**जागतिक शिक्षक दिनाच्या**
**हार्दिक शुभेच्छा!**

**- निरज रामलिंग मुळे**

# दहावीच्या विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या !

**अक्षराज : कैलास बोर्डे**

**दि.०५, ऐरोली :** तळवळी नाक्याचा राजा या मंडळाचे जेष्ठ कार्यकर्ते शहाजी केवले यांची कै.अनुष्का शहाजी केवले हिने दि. ३/१०/२०२५ ला गळफास घेऊन आत्महत्या केली.

ऐरोलीतल्या एस. डी. व्ही.शिकणारी दहावी ची विध्यार्थिनी होती. मिळालेल्या माहितीनुसार दहावी चे पेपर सुरु असताना तिच्या शेजारी कोणीतरी कागदाचा तुकडा फेकला. हा प्रसंग शिक्षकांच्या नजरेस पडल्यावर त्यांनी अनुष्का ला सर्वसमोर अपमानित केले आणि अत्यंत खालच्या भाषेत बोलले. या घठनेने मानसिक घाक्का बसलेल्या अनुष्काने शाळेतून घरी येऊन राहत्या घरात येऊन गळफास घेऊन जीवन संपवले. या घटनेने परिसरात हळहळ आणि संताप व्यक्त होत असून शिक्षकांवर करठोर कारवाई मांग केली जात आहे. दरम्यान, स्थानिक पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत तपास सुरु केला आहे. शाळा प्रशासनाकडून अद्याप अधीकृत निवेदन देण्यात आले नाही.

आत्महत्या करणे ही त्या शाळेतील ४ थी घठणा आहे असं समजलं जात आहे. पोलिसांनी परिसरातल्या लोकांना त्या मॅडम वर कारवाई होणार हे आश्वासन दिले आहे.

## आंदोलक...

बळीराजा आंदोलक
कटूवार्ता येती कानी
उतरला तो रस्त्यावर
युद्ध करी अभिमानी

विरोधात जातो कसा
टाका त्याले चिरडूनि
हिटलरी हवीयं वृत्ती
बसवा गप्प ओरडूनि

कायद्यांचे जंजाळात
ठेवी त्याले अडकूनि
खिळे ठोके रस्त्यावर
ठेवी त्याला अडवूनि

उपकार पोशींद्याचे
जाणायचे का ध्यानी
कृतघ्नता यावी अंगी
कृतज्ञता नको मनी

निसर्गआधी हटवादी
दंगा करी रानी वनी
कृषीकुंडली बिघडली
राहू केतू आडवे शनि

सात बारा नाही बरा
कर्जाखाली दबे धनी
नाईलाज इलाजाला
दुखणी ही असे जुनी

बळीराजा राज्य येता
जाती सारे आनंदुनि
आपलेचं रे चांगभले
कृषीदिनी घे रे ध्यानी

**- हेमंत मुसरीफ, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज



# थोडक्यात

## वाघुंडे बुद्रुक मधील रस्त्याचा प्रश्न मार्गी लावा - रविश रासकर

### कामगार नेते रविश रासकर यांचा आंदोलनाचा इशारा



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील वाघुंडे बुद्रुक येथील गावठाण ते रासकर वस्ती (मळाबाई मंदिर) आणि गावठाण ते भापकर मळा (दिवटे वस्ती) या मार्गावर अजूनही रस्त्याची अत्यंत गंभीर समस्या असल्याने स्थानिक शेतकरी व ग्रामस्थांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. या समस्येच्या पार्श्वभूमीवर कामगार नेते रविश रासकर यांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना निवेदन देऊन तातडीने रस्ता मंजूर करण्याची मागणी केली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, वस्तीवरील रस्ते दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचे असून शेतीमाल वाहतूकीसाठी आणि दुध व्यवसायासाठी या रस्त्याची गरज आहे. रस्ता नसल्याने शेतकरी, महिला, वृद्धांना आणि शाळकरी मुलांना शाळेत जाण्यासाठी अडथळ्यांचा सामना करावा लागत आहे. स्थानिक शेतकरी शासनाला कर भरत असतानाही त्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध होत नसल्याने हे दुर्दैव आहे, असेही त्यांनी नमूद केले आहे. शाळकरी मुलांना रस्त्याअभावी शाळेत जाता येत नसल्याचे स्पष्ट करत, हा रस्ता तातडीने मंजूर न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही रासकर यांनी दिला आहे. निवेदनाच्या प्रती विधानसभा सदस्य काशिनाथ दाते, गटविकास अधिकारी पंचायत समिती, तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, अहिल्यानगर यांना देण्यात आल्या आहेत.

## हिल लाईन पोलिसांची धडाकेबाज कामगिरी; गंभीर गुन्ह्यातील ५ आरोपींना ताब्यात



**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०५, उल्हासनगर (ठाणे) :** हिल लाईन पोलीस स्टेशन गु.र.नं. ५६६/२५, भारतीय न्याय संहिता कलम १८९(२), १८९(४), १९१(२), १९१(३), ३२४(४) सह शस्त्र अधिनियम ४, २५ व मपोका कलम ३७(१), १३५ अन्वये दाखल गुन्ह्यातील आरोपींचा शोध घेण्यात पोलीस पथकाला यश आले आहे. गुन्ह्यातील आरोपींचा तांत्रिक विश्लेषण करून पाहिजे आरोपी रोशन रवी साळवे (१९, रा. उल्हासनगर-४) यास जालना जिल्ह्यातील पारनेर, ता. अंबड येथून तर प्रीतम बाळू प्रधान (२०, रा. तक्षशिला रोड, उल्हासनगर-४) यास छत्रपती संभाजीनगरमधील हनुमान नगर येथून ताब्यात घेण्यात आले. न्यायालयाने दोन्ही आरोपींना दोन दिवसांची पोलीस कस्टडी सुनावली आहे.तसेच गुप्त बातमीदारांच्या मदतीने कानसाई रोड, सुभाष टेकडी, बुद्ध विहार, उल्हासनगर-४ (विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन हद्द) येथून सापळा रचून आणखी तिघांना ताब्यात घेण्यात आले. त्यामध्ये -श्याम उर्फ शाम्या बनकर (१९, रा. रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर-४)अनिकेत उर्फ टॉम खरात (२०, रा. रामजी आंबेडकर नगर, उल्हासनगर-४)अरहंत महेंद्र गायकवाड (१६, रा. रमाबाई आंबेडकर नगर, उल्हासनगर-४) (विधी संघर्षित बालक असून त्याला पालकांच्या ताब्यात नोटीस देऊन सोडण्यात आले आहे).आरोपी क्रमांक ३ ते ५ यांना आज न्यायालयात हजर करण्यात येणार आहे. ही संपूर्ण कारवाई पोलीस उपायुक्त परिमंडळ ०४ सचिन गोरे, सहाय्यक पोलीस आयुक्त शैलेश काळे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप शिवले व पोलीस निरीक्षक गुन्हे सिद्धेश्वर कैलासे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. कारवाईत सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेश बेंडकुळे, पोलीस उपनिरीक्षक संग्राम मालकर तसेच हिल लाईन पोलीस स्टेशन तपास पथकाने मोलाची भूमिका बजावली. हिल लाईन पोलिसांच्या या वेगवान व प्रभावी कारवाईमुळे परिसरातील नागरिकांत समाधान व्यक्त केले जात आहे.

## किनवट तालुक्यातील बंजारा समाज ऊस तोडीसाठी होत आहे स्थलांतरित

**अक्षराज : कैलास राठोड**


**दि.०५, किनवट (नांदेड) :** किनवट तालुक्यातील हजारो बंजारा समाजातील कुटुंबे यंदा ऊस तोडीसाठी विविध जिल्ह्यांकडे जाण्याची तयारी करत आहेत. तालुक्यात कोणताही ठोस रोजगार नसल्याने आणि शेती जवळपास उद्ध्वस्त झाल्याने ग्रामीण भागातील लोकांना जगण्यासाठी दुसऱ्या ठिकाणी मजुरीवर जावे लागत आहे.मुलांचं पालनपोषण आणि दैनंदिन खर्च भागवण्यासाठी तालुक्यातील तांडा, गाव, वाडी, वस्ती येथील नागरिक नांदेड, यवतमाळ, आदिलाबाद, पुणे, नाशिक, मुंबई, हैदराबाद अशा ठिकाणी कामाच्या शोधात निघाले आहेत.भारताला स्वातंत्र्य मिळून ७८ वर्षे झाली, तरी किनवट तालुक्यात विकासाचा दर नगण्य आहे. प्रशासन आणि जनप्रतिनिधी यांनी जर तालुक्याच्या विकासाकडे १ टक्का लक्ष दिलं असतं, तर आज किनवटचा ७८ टक्के विकास झाला असता, अशी जनतेत भावना व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तालुक्यातील नेते स्वतःच्या विकासात गुंतले असल्याचे लोक सांगत आहेत. ज्या नेत्यांकडे पूर्वी साधी मोटरसायकल नव्हती, ते आज महागड्या कार आणि फॉर्च्युनरमध्ये फिरताना दिसतात. तर दुसरीकडे साधी भोळी जनता कामाच्या शोधात वनवाटांवर भटकंती करत आहे. शासनाचे दुर्लक्ष, वाढती महागाई आणि रोजगाराचा अभाव यामुळे किनवट तालुक्यातील गोरगरीब जनता आज अत्यंत अडचणीत सापडली आहे.

## नितेश राणे च्या वक्तव्याची दखल घेण्यासाठी रवि खरात यांचे राज्यपालांना पत्र

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.०५, मिरा रोड :** मिरा रोड येथील नॉर्थ जे पी सोसायटी मधील नवरात्री गरबा खेळाच्या वेळीस अंडी टाकण्यात आल्या मुळे सोसायटी तील गरबा प्रेमी नी घटनेचा निषेध केला. सदर घटनेची दखल घेत मंत्री नितेश राणे नी सोसायटीला भेट दिली. त्या दरम्यान त्यांनी मुस्लिम समाजाला चेतावणी ही दिली. जर मुस्लिम ने पुन्हा असे केले तर तुमचा शुक्रवार खराब करू व हिरव्या रंगावरून ही आक्षेपार्थ व्यक्तव केली. त्याबद्दलची तक्रार राजपाल कडे पत्राने केली. जो आमदार किंवा मंत्री संविधानाची शपथ घेतात आणि धर्ममनीरपेक्ष तत्त्वा च्या सरळ विरोधात वागतात.,सदर बाब संविधान नियम भंगाचे स्पष्ट उदाहरण आहे. संविधानच्या प्रस्तावनेनुसार भारत हे सार्वभौम, समा जवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही गणराज्य आहे. त्यामुळे मंत्री नितेश राणेनी शपथभंग केली आहे आणि शहराचे सर्व धर्म एकोपा ला धोका पोचवला आहे. धर्मनिरपेक्ष ही भारतीय संविधानाची मूलभूत रचना (Basic Structure) आहे. म्हणून भारतीय लोकशाही वाचण्यासाठी मंत्री नितेश राणे वर कारवाई करावी अशीच मागणी केली आहे. सदर पत्र रवि खरात मिरा भाईंदर युवक काँग्रेस च्या प्रवक्ता ने दिले आहे.

## 'सविस्तर अहवाल पाठवा...': शेतकऱ्यांसाठी अमित शहा यांचे मोठे आश्वासन



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.०५, अहिल्यानगर :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदतीसाठी केंद्र सरकारकडून तत्काळ सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे. त्यांनी सांगितले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मदत करण्यात कोणताही विलंब करणार नाहीत. लोणी येथील शेतकरी मेळाव्यात ते बोलत होते. केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा आज शिर्डी, राहाता आणि कोपरगाव दौऱ्यावर आहेत. दौऱ्याची सुरुवात त्यांनी सकाळी शिर्डी साईबाबा मंदिरात जाऊन साईबाबांच्या समाधीचे दर्शन घेऊन केली.

समाधीचे दर्शन घेतल्यानंतर शाह यांच्या हस्ते साईबाबांची पाद्यपूजा करण्यात आली, तसेच शिर्डी माझं पंढरपूर ही छोटी आरतीही करण्यात आली. दर्शनानंतर साईबाबा संस्थानच्या वतीने शहा यांचा शॉल आणि साईबाबाची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय सहकार राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, जलसंपदामंत्री व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील, जलसंपदामंत्री गिरीश महाजन, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

साईबाबांच्या दर्शनानंतर शाह, फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्यासह सर्व मंत्री लोणीकडे रवाना झाले. प्रवरानगर येथील विखे पाटील साखर कारखान्याच्या विस्तारित कामाचे उद्घाटन तसेच लोणी येथे पद्मश्री विठ्ठलराव विखे आणि पद्मभूषण बाळासाहेब विखे पाटील यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आल्यानंतर लोणी बाजारतळ येथे अमित शाह यांच्या उपस्थितीत शेतकरी मेळावा पार पडला.

यावेळी बोलताना शहा म्हणाले की, महाराष्ट्रात शेतकऱ्यांवर संकट आहे. ६० लाख हेक्टरवरील पिके उध्वस्त झाली आहेत. ३१३२ कोटी राज्याला दिलेले आहेत, त्यातील काही रक्कम एप्रिलमध्ये दिली आहे. पंतप्रधान मोदींनी शेतकऱ्यांना मदत देण्यासाठी पुढाकार घेतला आहे. २२०० कोटींची मदत केली आहे. असेही शहा यांनी सांगितले.

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांबद्दल बोलताना ते म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची माझ्याशी बैठक झाली. राज्यातील या त्रिमूर्ती पैकी एकही व्यापारी नाही, पण व्यापाऱ्यापेक्षा कमी नाहीत. कार्यक्रमाला बोलावलं पण चर्चा मात्र शेतकऱ्यांना मदत देण्याबाबत केली. मी त्यांच्याकडून अहवाल मागवला आहे. मोदी सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी आहे, शेतकऱ्यांना तात्काळ मदत करेल,त्यात वेळ वाया घालणार नाही, असे आश्वासन त्यांनी दिले.

## पालघर मध्ये पिक नुकसान पाहण्यासाठी पालकमंत्री नाईक थेट शेताच्या बांधावर



**अक्षराज : निलेश कासट**

**दि.०५, डहाणू (पालघर) :** शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपने उभे असून शेतकरी यांना शासन सर्वतोपरी मदत करेल असे प्रतिपादन वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक यांनी केले. सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस झालेल्या अतिवृष्टीमुळे डहाणू आणि तलासरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे.

विशेषतः भात पिक कापणीसाठी तयार असतानाच झालेल्या मुसळधार पावसामुळे पिक आडवे पडले असून, ओलाव्यामुळे भाताला मोड आले आहेत. या पार्श्वभूमीवर नुकतेच वनमंत्री तथा पालघर जिल्ह्याचे पालकमंत्री गणेश नाईक, खासदार डॉ. हेमंत सवरा, आमदार राजेंद्र गावीत यांनी डहाणू तालुक्यातील विविध शेतांमध्ये जाऊन थेट पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात जिल्हाधिकारी डॉ.इंदु राणी जाखड, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज रानडे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी निलेश भागेश्वर, डहाणू तहसीलदार सुनील कोळी, तलासरी तहसीलदार अमोल पाठक, गटविकास अधिकारी पल्लवी सस्ते, उपविभागीय कृषी अधिकारी तरूणकुमार वैती आणि तालुका कृषी अधिकारी अनिल नरगुलवार तसेच जिल्ह्यातील अधिकारी आणि शेतकरी उपस्थित होते. पालकमंत्री गणेश नाईक यांनी डहाणू तालुक्यातील पोखरण येथील शेतकरी दत्तात्रय पाटील यांच्या शेतावर जाऊन प्रत्यक्ष नुकसानीचा आढावा घेतला. भात पिकाचे पंचनामे तातडीने पूर्ण करून अहवाल शासनाकडे सादर करण्याच्या सूचना त्यांनी अधिकारी यांना दिल्या.

यानंतर डहाणू तालुक्यातील जामशेत येथील स्नेहल अनंत पोद्दार यांच्या १२ एकर क्षेत्रावरील चिकू बागेचीही पाहणी करण्यात आली. अतिवृष्टीमुळे फुलगळ व फळगळ झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्याचे निदर्शनास आले. पालकमंत्री नाईक यांनी चिकू पिक परिस्थितीची माहिती घेऊन शेतकऱ्यांना योग्य ती मदत शासन देणार असल्याचे सांगितले. तलासरी तालुक्यातील मौजे- वडवली-ओझरपाडा येथील पूरबाधित घरे व भात शेतीची पाहणी केली. दिनांक २८ सप्टेंबर रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे वारोळी नदीचे पाणी घरात शिरल्याने तेथील नागरीकांना थलांतरीत करावे लागले होते. पालकमंत्री गणेश नाईक यांनी स्थानिक नागरिक व शेतक-यांशी संवाद साधला व आपदग्रस्त यांना शासकीय मदत देण्याबाबत आश्वस्त केले.

## बाळूभाऊंच्या प्रेरणेच्या बळावर 'भाऊचा दांडिया' चे चौथे पर्व यशस्वी : खा.धानोरकर




**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०४, चंद्रपूर :** 'दिवंगत खासदार बाळूभाऊ धानोरकर यांची प्रेरणा आणि चंद्रपूरकरांचे प्रेम यामुळेच हा महोत्सव दरवर्षी अधिक उत्साहाने पार पडतो,' अशा भावनिक शब्दात आपल्या भावना व्यक्त करत खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ' खासदार सांस्कृतिक महोत्सव - भाऊचा दांडिया' या सोहळ्याचे चौथे वर्ष दिनांक ०२ ऑक्टोबर रोजी थाटामाटात संपन्न झाले. दिवंगत खासदार बाळू धानोरकर यांच्या स्मृतीला वंदन करत सलग ११ दिवस ( २२ सप्टेंबर ते ०२ ऑक्टोबर) चांदा क्लब मैदानावर दांडियाचा मनसोक्त आनंद लुटला. यावेळी गुणवंत कलाकारांना दुचाकीसह लाखो रुपयांच्या रोख पुरस्काराचे वितरण करुन त्यांच्या कलागुणांना सन्मानित करण्यात आले. हा ११ दिवसांचा रंगारंग कार्यक्रम केवळ दांडियाचा मनमुराद आनंद देणारा नव्हता, तर शिक्षण, क्रिडा, कला, पत्रकारिता आणि सामाजिक कार्य अशा विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंत मान्यवरांचा गौरव करण्याचा एक महत्वाचा मंच ठरला. समारोपावेळी दांडिया स्पर्धेतील विजेत्यांना आकर्षक बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

खासदार प्रतिभा धानोरकर यांच्या हस्ते चॅम्पियन पुरुष गटातून अनुराग घोरपडे आणि चॅम्पियन महिला गटातून मनिषा सरकार यांनी दुचाकी आणि सन्मानचिन्ह पटकाविले. याशिवाय, किंग मध्ये धनंजय मेश्राम आणि क्वीन मध्ये सुष्मिता मलिक यांनी पारितोषिक मिळविले. यावेळी रील स्पर्धा, ग्रुप दांडिया, लहान गट आणि ३५ वर्षावरील महिला गटातील स्पर्धकांनाही रोख बक्षिसे देऊन प्रोत्साहन देण्यात आले. मराठा चॅरिटेबल ट्रस्ट आणि बाळू धानोरकर मित्र परिवार चॅरिटेबल सोसायटीच्या वतीने आयोजित या महोत्सवामुळे चंद्रपूरकरांना एकत्र येऊन आनंद साजरा करण्याची आणि दांडिया खेळण्याची उत्तम संधी मिळाली. या यशस्वी आयोजनाबद्दल स्पर्धकांनी न नागरिकांनी आयोजकाचे आभार मानले. यावेळी खा. प्रतिभा धानोरकर यांच्यासह शहरातील कॉंग्रेसचे कार्यकर्ते विविध पदाधिकारी आणि अनेक मान्यवर उपस्थित होते.

## कल्याण - शिळ फाट्यावरील वाहतूक कोंडी विषय पोहचला मुख्यमंत्र्यांकडे

### माजी आमदार भोईर यांनी मुख्यमंत्र्यांना दिले पत्र




**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.०५, शिळफाटा (ठाणे) :** कल्याण-शिळ फाट्यावरील वाहतूक कोंडी ही नागरिकांसाठी मोठी डोकेदुखी ठरत आहे. या परिसरातील लाखो नागरिकांचा अमूल्य वेळ रोज रस्त्यावर वाया जातोय, ज्यामुळे त्यांचे आरोग्य आणि व्यवसाय यावर गंभीर परिणाम होत आहे.

आपल्या विद्यार्थ्यांना, रूग्णांना याचा फटका बसतो. ही गंभीर समस्या युद्धपातळीवर सोडवण्यासाठी, आज महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माजी आमदार सुभाष भोईर यांनी भेट घेऊन एक सविस्तर निवेदन व पत्र सुपूर्द केले. नागरिकांचा होणारा त्रास आणि वेळेची हानी थांबवण्यासाठी तातडीने कायमस्वरूपी तोडगा काढण्याची विनंती केली आहे.मा. मुख्यमंत्र्यांनी या विषयाचे गांभीर्य लक्षात घेतले असून, प्रशासकीय स्तरावर त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

## विठ्ठलवाडी पोलिसांनी सोन्याच्या मण्यांची चोरी केली ३ तासांत उघडकीस

**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**

**दि.०५, कल्याण (ठाणे) :** विठ्ठलवाडी पोलीस स्टेशन हद्दीत दाखल झालेल्या सोन्याच्या मण्यांच्या चोरीचा गुन्हा केवळ ३ तासांत उघडकीस आणत पोलिसांनी १०० टक्के मुद्देमाल हस्तगत करण्यात यश मिळवले आहे. दि.०४ ऑक्टोबर रोजी रात्री ११.३० वाजता गुन्हा र. नं. ६५८/२५, कलम ३०५(अ) बी.एन.एस. प्रमाणे दाखल झाला होता. फिर्यादीच्या सोन्याच्या दुकानातून अज्ञात चोरट्याने काउंटरवर ठेवलेले १५ ग्रॅम वजनाचे, किंमत रुपये ९० हजार असलेले सोन्याचे १८४ नग मणी चोरीला नेले होते. गुन्ह्याचा तपास सुरू होताच गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस शिपाई मंगेश वीर व सुनील गावित यांनी तांत्रिक विश्लेषण करून आरोपीचा शोध घेतला. आरोपीचे नाव मोहम्मद हुसेन इनायत अली खान (वय ४०, रा. सोनिया कॉलनी, खडेगोलवली, कल्याण पूर्व) असे समोर आले. पोलिसांनी तांत्रिक पद्धतीने शोध घेऊन त्याला ताब्यात घेतले असता त्याच्या अंगझडतीतून चोरीस गेलेले सर्व १८४ नग सोन्याचे मणी (१५ ग्रॅम, किंमत ९०,०००/- रुपये) जप्त करण्यात आले. ही धडाकेबाज कारवाई पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रहार गोडसे यांच्या मार्गदर्शनाखाली खालील पथकाने केली –

स.पो.नि. कुलकर्णी
पो.हवा. ५९५ दीपक पाटील
पो.हवा. ६३१९ हरिश्चंद्र घाणे
पो.शि. ४३०० मंगेश वीर
पो.शि. ३६२१ प्रदीप बुरकुल
पो.शि. ७२९८ सुनील गावित

गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

# लासलगाव बस स्थानकातील कर्मचाऱ्यांचा भोंगळ कारभार

## विद्यार्थ्यांना 3 तास ताटकळत बसावे लागले

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.०५, विंचूर (नाशिक) :** लासलगाव बसस्थानकातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजी आणि भोंगळ कारभारामुळे शालेय विद्यार्थ्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. दिनांक ०३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता शाळा सुटल्यानंतर लासलगाव – खानगाव मार्गावरील बसची वाट पाहत विद्यार्थी साडेपाच वाजल्यापासून तब्बल ३ तास स्थानकात ताटकळत बसले. वेळेवर बस न आल्याने विद्यार्थ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला. लवकर घरी न पोहोचल्याने चिंताग्रस्त पालकांनी संपर्क साधल्यावर मुलं अजूनही बसस्थानकात असल्याचं समजताच, पालकांनी स्थानकावर धाव घेत कर्मचाऱ्यांकडे संतप्त सूर लावले.




परिस्थिती नियंत्रणाबाहेर जात असल्याचं लक्षात येताच लासलगाव पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी थेट बस स्थानकातील कर्मचाऱ्यांना जाब विचारत, जर बसची व्यवस्था होत नसेल, तर आम्हीच पोलीस व्हॅनमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या गावी पोहोचवतो, अशी ठाम भूमिका घेतली. त्यानंतरच बसची तात्काळ व्यवस्था करण्यात आली आणि विद्यार्थ्यांना सुरक्षितरित्या त्यांच्या गावी पोहोचवण्यात आलं.

या घटनेनंतर पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत असून, लासलगाव आगारातील निष्काळजी कर्मचाऱ्यांवर तातडीने कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात येत आहे. या घटनेने पुन्हा एकदा राज्य परिवहन महामंडळातील शिस्त व कार्यप्रणाली वर प्रश्नचिन्ह निर्माण झालं आहे. विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी आणि प्रवाशांच्या सोयीसाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे गरजेचे ठरत आहे.

माझी चारचाकी गाडी नैताळा येथे भर पावसात रस्त्यावर पाणी असल्याने पाण्यात अडकली होती. काही गाड्या पाण्यात होत्या, तर काही वाहने पाण्यामुळे बंद पडल्या होत्या. हे माझ्या निदर्शनास आले. त्यावेळी काही महिला, महामंडळाच्या बसला हात दाखवून, थांबवत होत्या, पण एकही बस उभी राहिली नाही. परिस्थिती पाहूनही चालक–वाहक यांना प्रसंगावधान नव्हतं. एवढी बेदरकार वृत्ती का ?

**- सुनील क्षिरसागर, विंचूर**

आम्हाला वरूनच परवानगी नाही. ठरलेल्या बस थांब्याशिवाय बस उभी करायची आम्हाला परवानगी नाही.

**- बस चालक व वाहक**

# थोडक्यात

## रेणापूरची मदियासय्यदचे भारतात द्वितीय स्थान; पंतप्रधान यांच्याकडुन सत्कार

**अक्षराज : प्रतिनिधी**



**दि.०४, लातूर :** जुलै २०२५ मध्ये झालेल्या अखिल भारतीय व्यवसाय (ITI) परीक्षेत रेणापूर औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील विद्यार्थिनीमदिया खदीर सय्यदहिने भारतातद्वितीय क्रमांकमिळवून रेणापूरसह लातूर जिल्ह्याचा गौरव वाढविला आहे. मदिया सय्यद हिने १२०० पैकी ११९२ गुण (९९.६६ टक्के) मिळवत हे यश संपादन केले. तिच्या या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेतपंतप्रधान नरेंद्र मोदीयांच्या हस्ते नुकताचदिल्ली येथे तिचा सत्कारकरण्यात आला. मदियाचे वडीलखदीर सय्यदहे व्यवसायाने बांधकाम मजूर असूनही, आपल्या मुलींच्या शिक्षणात कोणतीही तडजोड केली नाही. गरिबीवर मात करत मदियाने जिद्दीच्या जोरावर हे अप्रतिम यश मिळवले आहे. या यशामध्ये तिचे आई–वडील, शिक्षक आणि संपूर्ण संस्थेचा मोठा वाटा आहे. मदियाच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत असून, तिच्या यशामुळे रेणापूरच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला गेला आहे.

## महाराष्ट्र विद्यालयाचे कुस्तीगीर चमकले

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.०५, नागपूर :** सुरेश भट सभागृह रेशीम बाग नागपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत महाराष्ट्र विद्यालयाच्या कुस्तीगीरांनी उल्लेखनीय कामगिरी केली.जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धेत प्राविण्य प्राप्त करणारे कुस्तीगीर

१७ वर्षा खालील मुलांमध्ये – ७१ किलो खाली अभय बंदेवार प्रथम

१९ वर्षा खालील मुलामध्ये – ७० किलो खाली कुशल आवळे प्रथम

तर ग्रिकोरोमन कुस्ती स्पर्धेत ६० किलो खालीप्रशांत भुरे व १३० किलो खाली निरंजन बिंझाडे यांनी व्दितीय क्रमांक प्राप्त केला. प्रथम करणारे अभय बंदेवार व कुशल आवळे हे नागपूर येथे होणाऱ्या शालेय विभागीय कुस्ती स्पर्धेकरिता नागपूर जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत. महाराष्ट्र राज्य शिक्षण संस्थेचे व माजी मंत्री सुनील केदार, सचिव सुहासताई केदार, सुधिर केदार व संस्थेचे सर्व पदाधिकारी, विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण वडस्कर, उपमुख्याध्यापक चंद्रशेखर लिखार, प्रा.विजय टेकाडे, प्रा.दिगांबर आडे, क्रीडाशिक्षक धर्मेंद्र सुर्यवंशी, धैर्यशील सुटे, व सर्व शिक्षक व कर्मचारी वर्गाने खेळाडूंचे अभिनंदन केले.

## कोळसेवाडी वाहतूक पोलिसांची सतर्कता - चोरीची रिक्षा जप्त


**अक्षराज : विश्वनाथ शेनोय**



**दि.०५, कल्याण (ठाणे) :** कोळसेवाडी वाहतूक उपविभागातील पो.शि.डहाळे (ब. क्र. ७६३१) हे दि.०५ ऑक्टोबर २०२५ रोजी चक्कीनाका येथे वाहतूक नियमनाची जबाबदारी पार पाडत असताना, पूना लिंक रोडवर संशयित रिक्षा आढळले. तिसगाव नाक्याकडून चक्कीनाका दिशेने येणारी रिक्षा (क्र. MH४६AZ८११८) थांबवून चालकाकडून वाहन चालक परवाना व इतर कागदपत्रांची विचारणा करण्यात आली. यावेळी चालकाने मी कागदपत्रे विसरलो आहे, १० मिनिटांत घेऊन येतो असे सांगून रिक्षा सोडून पसार झाला. यानंतर वाहनाचे तपशील मिळवून मालकाशी संपर्क साधला असता, हीच रिक्षा दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी पनवेल येथून चोरीस गेल्याचे आणि त्याबाबत पनवेल पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद असल्याचे स्पष्ट झाले. सदर रिक्षा कोळसेवाडी वाहतूक उपविभाग, चक्कीनाका येथे जप्त ठेवण्यात आली असून पनवेल पोलिसांशी संपर्क साधून पुढील कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. ही कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक सचिन सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## श्री.धनलक्ष्मी महिला मंडळ वाशी संस्थे तर्फे कलाशिक्षक पवळे यांचा सन्मान

**अक्षराज : आदिनाथ देशमुख**



**दि.०५, नवी मुंबई :** श्री धनलक्ष्मी महिला मंडळ वाशी या संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाली आरोग्य महोत्सवी वर्षा निमित्ताने नवी मुंबईतील कलावंताचा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आलेला होता. कार्यक्रमात उपस्थित प्रमुख पाहुण्यांच्या शुभहस्ते सुप्रसिद्ध आंतरराष्ट्रीय रांगोळी कार श्रीहरी पवळे यांचा नवी मुंबई कला भूषण पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला. श्रीहरी पवळे यांना या अगोदर ही अनेक संस्था नी सन्मानीत केले आहे. संस्थेच्या अध्यक्षा डॉ.वनिता गडदे यांनी विशेष मेहनत घेऊन या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.

## भक्ती भावाने आणि शांततेत दुर्गा मातेला निरोप

**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.०४, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी शहर दुर्गा मातेच्या जयजयकाराने दुमदुमला. भक्ती, आनंद आणि उत्साहाने नटलेल्या वातावरणात दुर्गादेवी विसर्जनाची मिरवणूक मोठ्या जल्लोषात व शांततेत पार पडली. पोलिसांच्या चोख बंदोबस्तात झालेल्या या मिरवणुकीत भक्तांनी जोर से बोलो, जय माता दी च्या घोषात मातेला अखेरचा निरोप दिला. कुंडलवाडी शहर व परिसरातील मिळून तब्बल ३७ दुर्गामाता मंडळांनी सहभाग नोंदवून उत्सवाला भव्य स्वरूप दिले. मिरवणुकीला काल सायंकाळी ६ वाजता सुरुवात झाली आणि ती रात्री दहापर्यंत शहरभर फिरली. ढोल, ताशे, आणि डीजेच्या तालावर युवकांनी जल्लोष करत मातेच्या मिरवणुकीला महिलांनी दांड्या खेळत निरोप दिला. संपूर्ण परिसर मातेच्या जयघोषाने दणाणून गेला. शहरातील वेगवेगळ्या चौक मधून फिरत बाजारातील डॉ. हेडगेवार चौक या प्रमुख चौकातून मिरवणूक फेरी मारत गेली. विसर्जन पाहण्यासाठी कुंडलवाडी शहरासह तालुकाभरातून हजारो नागरिकांनी गर्दी केली होती. मिरवणूक शांततेत पार पडावी. म्हणून पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे आणि पोलीस उप निरीक्षक मांजरमकर यांच्या नेतृत्वाखाली विशेष पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. यामध्ये १६ पोलीस कर्मचारी आणि २२ होमगार्ड स्ट्रायकिंग – ६ कर्मचारी यांनी शिस्तबद्ध सेवा बजावली.

# अधिकारी, कर्मचारी यांच्या आस्थापनेची चौकशी करा - आ.अडबाले

## सहविचार सभेत ४ प्रकरणे ऑन द स्पॉट निकाली

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०५, चंद्रपूर :** माध्यमिक शिक्षण विभागातील अधिकारी, कर्मचारी यांच्या आस्थापनेची तात्काळ चौकशी करण्यात यावी व जे अधिकारी, कर्मचारी शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रकरणे वेळेत निकाली काढण्यास महाराष्ट्र सेवा हमी कायदा २०१५ चे उल्लंघन करीत असतील, त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करण्याच्या सूचना नुकत्याच पार पडलेल्या सहविचार सभेत आमदार सुधाकर अडबाले यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) राजेश पातळे यांना दिल्या. आ. सुधाकर अडबाले यांच्या पुढाकाराने विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाच्या 'समस्या तुमच्या, पुढाकार आमचा' या उपक्रमाअंतर्गत शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. चंद्रपूर यांच्याकडे चंद्रपूर जिल्ह्यातील खासगी अनुदानित माध्यमिक, उच्च माध्यमिक शाळेत कार्यरत शिक्षक – शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारणार्थ समस्या निवारण सभा बुधवारी मा. सा. कन्नमवार सभागृह, चंद्रपूर येथे पार पडली. यावेळी ४ प्रकरणांना 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. मागील प्रत्येक सभेत 'ऑन द स्पॉट' प्रकरणे निकाली काढली जात असल्याने आ. सुधाकर अडबाले यांच्या कामगिरीवर शिक्षक – कर्मचाऱ्यांत समाधान व्यक्त केले जात आहे. सभेत प्रवीण धोटे (नेहरू विद्यालय तथा विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय चंद्रपूर) यांना मुख्याध्यापक पदास सुधारित वेतन श्रेणी, दर्शन गोरंटीवार (जनता विद्यालय पोंभुर्णा), योगेश पाचभाई, प्रीती लांडे (जनता विद्यालय चंद्रपूर) यांना शिपाई पदास सेवासातत्यास 'ऑन द स्पॉट' मान्यतेचे पत्र देण्यात आले. सभेत जिल्ह्यातील अनुकंपा प्रकरण, मान्यता वर्धित



व मंडळ मान्यताबाबत, शिक्षक – कर्मचाऱ्यांचे समायोजन, वेतन, वैद्यकीय देयके, वरिष्ठ / निवड श्रेणी अश्या ७० च्यावर सामूहिक व वैयक्तिक समस्यांवर चर्चा करण्यात आली.

सभेला शिक्षणाधिकारी (माध्य.) राजेश पातळे, उपशिक्षणाधिकारी गणेश येळणे, वेतन पथक अधीक्षक निकीता ठाकरे, लेखाधिकारी वडेट्टीवार, म. रा. माध्यमिक शिक्षक महामंडळाचे सदस्य लक्ष्मणराव धोबे, विदर्भ माध्यमिक शिक्षक संघाचे जिल्हाध्यक्ष सुनील शेरकी, जिल्हा कार्यवाह दीपक धोपटे, महानगर अध्यक्ष दिगांबर कुरेकार, महानगर कार्यवाह सुरेंद्र अडबाले, जिल्हा उपाध्यक्ष आनंद चलाख, हेमंतकुमार किंदरले, सहकार्यवाह हरिहर खरवडे, जिल्हा कोषाध्यक्ष नितीन जीवतोडे, डॉ. विजय हेलवटे, प्रज्ञा बारेकर, आसमा खान, श्रीहरी शेंडे, शेखर जुमडे, सुरेश डांगे, प्रभाकर पारखी, अनिल कंठीवार, विजय भोगेकर व मोठ्या संख्येने जिल्ह्यातील विमाशि संघाचे सदस्य, समस्याग्रस्त शिक्षक उपस्थित होते.

# रयत शिक्षण संस्थेचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

**अक्षराज : विकास दळवी**

**दि.०४, सातारा :** शिक्षणाच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास हे रयत शिक्षण संस्थेचे उद्दिष्ट आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी १०० वर्षांपूर्वी स्थापन केलेल्या या संस्थेचे उद्दिष्ट १०० वर्षानंतरही तसभर बदललेले नाही. रयत शिक्षण संस्था ही अशा प्रकारची महाराष्ट्रातील एकमेव संस्था आहे. स्थापनेपासून आजही शिक्षण हाच 'रयत'चा धर्म राहिला आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध ग्रामीण कवी इंद्रजीत भालेराव यांनी केले. रयत शिक्षण संस्थेच्या १०६ व्या वर्धापन दिन समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे चेअरमन चंद्रकांत दळवी हे उपस्थित होते, याप्रसंगी संस्थेचे व्हा. चेअरमन ॲड.भगीरथ शिंदे, संघटक डॉ.अनिल पाटील, कुलगुरू प्रिं.डॉ. ज्ञानदेव म्हस्के, कर्मवीर कुटुंबीय, संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार रामशेठ ठाकूर, जे.के.जाधव, प्रभाकर देशमुख, सदाशिव कदम, भैय्यासाहेब जाधव, अरुण पवार, प्रशांत पाटील, यशवंत पाटणे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना ते म्हणाले, रयत शिक्षण संस्था ही गुणवत्तेला प्राधान्य देणारी संस्था आहे. स्थापनेपासून आजअखेर मूळ उद्देशानुसार चालणारी ही संस्था होय. महाराष्ट्रातील पुरोगामी समाजसुधारकांची एकत्रित सत्वे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यात होती. छत्रपती शिवाजी महाराजांपासून प्रेरणा घेऊन शिक्षण संस्थेला 'रयत' हे नाव दिले. देशाच्या विकासासाठी दृष्टी देणारे नेतृत्व रयतकडे आहे. कर्मवीरांनी शिक्षणाला श्रमाची जोड दिली. कर्मवीर ही पदवी जनतेच्या मुखातून आलेली आहे. आज रयत शिक्षण संस्थेत जागतिक पातळीवरील उपक्रम सुरू आहेत. यावेळी त्यांनी विविध गाजलेल्या कविता सादर केल्या. 'बाप', 'जन्म', 'गावकडं चल माझ्या दोस्ता' या कवितेवर उपस्थित विद्यार्थ्यांनी ठेका धरला.

चेअरमन चंद्रकांत दळवी संस्थेच्या प्रगतीबाबत बोलताना म्हणाले, उत्साहाने काम करणारे शिक्षक हीच रयतची ताकद आहे. रयतच्या सर्व शाखेत इंटरॲक्टिव्ह पॅनल,




कृत्रिम बुद्धिमत्ता प्रशिक्षण, ईआरपी स्वॉफ्टवेअर, संस्थचे स्वतःचे डेटा सायन्स सेंटर इत्यादी नवीन धोरणाबद्दल माहिती दिली. सर्व प्रकारच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करून घेणारी रयत अकॅडमी सुरु करीत असल्याचे यावेळी त्यांनी जाहीर केले. संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

रयत शिक्षण संस्थेच्या वाटचालीत भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींच्या स्मरणार्थ उपक्रमशील शाखा, उपक्रमशील शिक्षक, लाईफ वर्कर, लाईफ मेंबर, प्राचार्य, आदर्श विद्यार्थी, विद्यार्थिनी, विज्ञान शिक्षक, कार्यक्षम गुरुकुल प्रमुख इत्यादी पुरस्कार देण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार प्राप्त शिक्षिकेचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन डॉ. सविता मेनकुदळे यांनी केले.

कार्यक्रमास उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. शिवलिंग मेनकुदळे, माध्यमिक विभागाचे सहसचिव श्री.बी.एन.पवार, ऑडीट विभागाचे सहसचिव प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, ॲड. दिलावर मुल्ला इत्यादींची उपस्थिती होती. सहसचिव प्राचार्य डॉ.शिवलिंग मेनकुदळे यांनी आभार मानले. या कार्यक्रमास संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, जनरल बॉडी सदस्य, आजीव सभासद,आजीव सेवक, विविध शाखांचे शाखाप्रमुख, प्राध्यापक, शिक्षक, विद्यार्थी, शिक्षणप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुदखेडला होणार ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.०५, मुदखेड (नांदेड) :** नांदेड येथील डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाअंतर्गत मुदखेड येथे ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र उभारण्याची कार्यवाही सुरू झाली आहे. आमदार श्रीजया चव्हाण यांच्या पुढाकारातून आकार घेत असलेल्या या प्रकल्पामुळे मुदखेड व परिसरातील नागरिकांसाठी १०० खाटांचे आरोग्य सुविधा केंद्र उपलब्ध होणार आहे. या केंद्रासाठी लागणाऱ्या भूखंडासाठी मान्यता मिळाली आहे. ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्र हे वैद्यकीय शिक्षण महाविद्यालय व रुग्णालयाशी संलग्न असे प्रशिक्षण व आरोग्यसेवा केंद्र असते. ग्रामीण भागातील नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यासोबतच वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना व इंटर्न डॉक्टरांना ग्रामीण क्षेत्रात आरोग्यविषयक प्रत्यक्ष अनुभव मिळावा, हा या केंद्राच्या स्थापनेचा उद्देश असतो. या केंद्रासाठी माजी मुख्यमंत्री खासदार अशोकराव चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली आमदार श्रीजया चव्हाण यांनी पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे मुदखेडच्या ग्रामीण आरोग्य प्रशिक्षण केंद्रासाठी मुदखेड नगरपरिषदेच्या हद्दीतील गट क्र. ४६० मधील जलसंपदा विभागाची २ हेक्टर जमीन कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास संमतिपत्र मिळाले आहे. या भूखंडाच्या मोबदल्यात वैद्यकीय शिक्षण विभागाकडून ८.५४ कोटी रुपये अदा करण्यास संमती प्रदान करण्यात आली आहे. या केंद्रात सोनोग्राफी, पॅथॉलॉजी लॅब, मायक्रोबायोलॉजी लॅब, बायोकेमिस्ट्री लॅब, एक्स–रे मशीन, होस्टेल, निवासी डॉक्टरांसाठी निवासस्थाने आदी सुविधा उभारल्या जाणार आहेत.